# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या दोन विद्यार्थ्यांची राष्ट्रीयस्तरीय "अन्वेषण-२०२३" या संशोधन स्पर्धेकरीता निवड झाली आहे.

या संशोधन स्पर्धेचे आयोजन गुजरात येथील गणपत विद्यापीठ, मेहसाणा येथे १६ व १७ मार्च रोजी करण्यात आले आहे. अन्वेषण संशोधन स्पर्धा दोन टप्यात घेतली जाते. पहिल्या टप्यात पुणे येथील अजिंक्य डीवाय पाटील विद्यापीठात ११ व १२ जानेवारी रोजी पुर्वक्षेत्रीय अन्वेषण २०२३ स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विद्यापीठ संघातील सोपान नांगरे व नीरज पवार या दोन विद्यार्थ्यांच्या संशोधनाची निवड राष्ट्रीयस्तरावरील स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. हे दोन विद्यार्थी राष्ट्रीय स्पर्धेसाठी रवाना झाले असून कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्यासह इतर शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## बातमी क्रमांक २

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबिरासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा सात व्यक्तींचा संघ नागपूर येथे रवाना झाला.

नागपूर येथील राष्ट्र संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे दि.१३ ते १७ मार्च दरम्यान प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबीर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरासाठी विद्यापीठाच्या संघात गौरव निकम (समाजकार्य विभाग, कबचौउमवि), अजय सोळूंके (कला महाविद्यालय, बामखेडा), मेहूल नांद्रे (कला, विज्ञान महाविद्यालय, दहिवेल), नेहा गवळे ( आदर्श महाविद्यालय, निजामपूर जैताणे), पुनम भिल ( कला महाविद्यालय, मारवड), समिंदा वसावे (शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर) यांचा समावेश असून संघव्यवस्थापक डॉ. सुषमा सनेर (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कुसुंबा) या सोबत असणार आहेत. या संघास कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. पांडुरंग पाटील (नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव), रासेयो सल्लागार समिती सदस्य विलास पाटील, कैलास औटी, व विजय बि-हाडे हे उपस्थित होते.

## बातमी क्रमांक ३

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्र, सामाजिकशास्त्र प्रशाळा व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महिला जागर सप्ताह अंतर्गत आत्मनिर्भर युवती अभियान आयोजित करण्यात आले आहे.

या अभियाना अंतर्गत १० मार्च रोजी विद्यापीठातील आरोग्य केंद्रात हिमोग्लोबीन तपासणी शिबीर घेण्यात आले तसेच महिला आरोग्य जनजागृती या विषयावर वैद्यकीय अधिकारी डॉ. अर्चना सांगळे यांनी आपल्या भाषणात पौष्टिक आहाराचे महत्व सांगून प्रसूतिपूर्व विकासाचे जीवशास्त्र, अंतस्त्रावी प्रणाली, कार्बोहायड्रेट्स, थायरॉइड टेस्ट, इत्यादी विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना स्त्री अभ्यास केंद्राच्या विभागप्रमुख डॉ. संजिवनी भालसिंग यांनी सप्तरंगी आहार संकल्पना समजावून सांगितली.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

दि. ११ मार्च रोजी युवती स्वयंरोजगार प्रशिक्षण व रोजगाराच्या विविध शासकीय योजना या विषयावर विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी विद्यार्थिनींना नोकरी कशी शोधायची, रेझ्युमे कसे बनवायचे, कोणत्या वेबसाईट शोधायच्या, मुलाखतीसाठी शारीरिक व मानसिक तयारी कशी करावी, देहबोली, हावभाव, आवाजातील आरोह-अवरोह इत्यादीबाबत मार्गदर्शन केले. यावेळी जैवशास्त्रीय प्रशाळेतील प्रेरणा गरूड या विद्यार्थिनीच्या उपशिक्षणाधिकारीपदी झालेल्या निवडीबद्दल व तेजश्री तायडे या विद्यार्थिनीस रेल्वे रीक्रुटमेंट बोर्डाच्या परीक्षेतील यशाबद्दल तर श्रृती शर्मा हीला अविष्कार स्पर्धेतील कामगिरीबद्दल गौरविण्यात आले. सुत्रसंचालन ऐश्वर्या धामणे तर आभार कुमूदिनी पाटील हीने मानले. यावेळी समन्वयक डॉ. विश्रांती मुंजेवार, सहसमन्वयक भाग्यश्री पाटील व इतर विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक:१३ मार्च, २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारीकरीता